| प्रथम न्यायदंडाधिकारी श्रीम. श्रुती ह. पाटील, न्यायदंडाधिकारी वर्ग - १ देवरुख जि. रत्नागिरी यांचे न्यायालयात | |
|---|---|
| | संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ४०/२०२४<br>निशाणी क्र. ०२ |
| | CNR No. MHRT080000612024 |

०१– गुन्हा घडल्याचा दिनांक : ०५/१२/२०२३

०२– गुन्हा रिपोर्ट केल्याचा दिनांक : ०६/१२/२०२३

०३– फिर्यादीचे नाव: सरकार तर्फे : महाराष्ट्र शासन मार्फत चंद्रकांत तुकाराम कांबळे, सपोफौ/२४०, पोलीस ठाणे संगमेश्वर, ता. संगमेश्वर, जिल्हा– रत्नागिरी.

०४– आरोपीचे नाव : **सिध्देश सुरेश पंडव**, वय–२३ वर्षे, रा. चिखली, पंडववाडी, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी

०५– गुन्हयाचा तपशिल :

वर दोषारोप ठेवण्यात येतो कि,

तुमच्यावर असा आरोप निश्चीत करण्यात येत आहे की, दिनांक ०५.१२.२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजताचे सुमारास मौजे चिखली ते कडवई जाणारे रोडवर चिखली पंडववाडी तळ या ठिकाणी बावा बांबाडे यांचे घराचे समोर रस्त्यावर येथे **सुरेश तुकाराम पंडव** यांनी त्यांच्या ताब्यातील अॅक्टीवा गाडी क्र. एमएच ०८ एए १४३७ ही चिखली ते कडवई अशी रोडने चालवित जात असताना वरील तारखेस, वेळी व जागी रस्त्याचे विशिष्ट परीस्थीतीकडे दुर्लक्ष करुन हयगयीने, अतिवेगाने, अविचाराने अॅक्टीवा गाडी चालवुन गाडीवर पाठीमागे बसलेली महिला सुंदा मारुती मालप, वय ६५ या गाडीवरुन रस्त्यावर खाली पडुन त्यांच्या डोक्याला लहान मोठ्या गंभीर दुखापतीस कारणीभुत झालात, तसेच जखमी महीला यांच्यावर वैद्यकीय हॉस्पीटल ग्रेटर एल.टी.एमजी हॉस्पीटल, सायन मुंबई या ठिकाणी अधिक उपचार चालु असताना दि. १२/१२/२०२३ रोजी ००.३० वा. मयत झालेल्या

आहेत.

सदर तपासामध्ये सुरेश तुकाराम पंडव यांनी चालविलेली अॅक्टीवा गाडी क्र. एमएच ०८ एए १४३७ ही गाडी तुमच्या नावावर असल्याने सुरेश पंडव यांचेकडे गाडी चालविण्याचा परवाना नसताना तुंम्ही त्यांना वरील तारखेस, वेळी व जागी अॅक्टीवा गाडी चालविण्यास दिली. म्हणून तुम्ही **मो.वा.का.१९८८ चे कलम ५/१८१** अन्वयेचा गुन्हा केला.

**आरोपीचे निवेदनः**

प्र.क्र.१ तुम्हास पोलीस पेपर्सच्या प्रती मिळाल्या काय?

उत्तरः होय.

प्र.क्र.२ तुम्हास वाचुन दाखवण्यात आलेला दोषारोप समजला आहे काय?

उत्तरः होय.

प्र.क्र.३ तुम्हास गुन्हा कबुल आहे काय?

उत्तरः होय.

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2024.03.03 12:32:53 +0530

(श्रुती ह. पाटील)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
देवरुख.

दिः ०३/०३/२०२४.

**आरोपीची सही.** ---------------

## न्यायनिर्णय

**(दिनांक ०३/०३/२०२४)**

आरोपीने स्वेच्छेने गुन्हा कबुला केला. त्याची चौकशी केली असता आरोपीने सदर गुन्हा स्वमर्जीने कबुल केल्याचे स्पष्ट आहे. आरोपीने कमीत कमी शिक्षा करण्याची विनंती केली. आरोपीचा हा पहिलाच गुन्हा आहे. त्याने इतर काही गुन्हा केल्याचे अभिलेखावर नाही. सबब खालील आदेश परित करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

आरोपी **सिध्देश सुरेश पंडव**, वय–२३ वर्षे, रा. चिखली, पंडववाडी, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी यास फौ.प्र.सं.चे कलम २५२ अन्वये **मो.वा.का.१९८८ चे कलम ५/१८१** अन्वयेच्या गुन्हयाकरीता दोषी धरुन **मो.वा.का.कलम ५/१८१ गुन्हयासाठी दंड रु. ५०००/– (रु. पाच हजार मात्र)** करण्यात आला. दंड न भरल्यास आरोपीने **०७** दिवसांची साधी कैद भोगावी.

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2024.03.03 12:33:00 +0530

(श्रुती ह. पाटील)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
देवरुख.

दिः ०३/०३/२०२४

| **<u>CERTIFICATE</u>** | | |
|---|---|---|
| Judgment/Order in SCC no. 40-2024<br>I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence. | | |
| Name of the Stenographer | : | K. V. Vaje (Jr. Clerk) |
| Court name | : | Jt. Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 03/03/2024 |
| Order signed by the presiding officer on | : | 03/03/2024 |
| Order uploaded on | : | 03/03/2024 |